# University of Mumbai

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/~~निकाल कक्ष~~
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/३९८/२०१९

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक आपणा सर्वांना कळविण्यात येते की, द्वितीय सत्र २०१९ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या खालील नमुद अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत.

1) T.Y.B.A. (Sem-V & VI) (Choice Based)
2) T.Y.B.A. (Idol) (Yearly)
3) T.Y.B.Sc. (Sem-V & VI) (Choice Based)
4) T.Y.B.Sc. (I.T.) (Sem-V & VI) (Choice Based)
5) T.Y.B.Com. (Idol) (Yearly)
6) T.Y.B.Com. (Sem-V & VI) (Choice Based)
7) T.Y.B.Com. (Accounting & Finance), (Banking Insurance) & (Financial Markets) (Sem-V & VI) (Choice Based)
8) B.M.S. (Sem-V & VI) (Choice Based)
9) B.M.M. (Sem-V & VI) (CBSGS)
10) M.M.S. (Sem- III & IV) (Choice Based)
11) B.Ed. (Choice Based) (Sem- I to IV)
12) LL.B. (3 year Course) (Sem- V/VI)
13) LL.B. (5 Year Course) (Sem-IX/X)
14) LL.M. (Sem- I to III)
15) M.A., M.Sc and M.Com. (Sem- I to IV) (Choice Based)
16) M.A., M.Sc and M.Com. (Idol) (Part- I & II) (Yearly)
17) F.E. (Sem- I & II) (Choice Based)
18) B.E. (Sem- VII & VIII) (Credit Based/CBSGS), B.E. (Sem- VII) (Choice Based)
19) B.Pharm. (Sem-VII) (Choice Based)
20) M.C.A. (Sem- I to V) (Choice Based/CBSGS)
21) M.C.A. (Idol) (Sem- I to V) (Rev.)

# University of Mumbai

**Path for Online Application:-**

www.mu.ac.in → Exams & Results → Examination → Application for Revaluation / Photocopy

Read the instructions carefully and proceed for filling the form.

उपरोक्त लिंक संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर पुढील सात दिवसाच्या आत सुरू करण्यात येईल व लिंक सुरू झाल्यापासून पुढील बारा दिवसांपर्यंत ही लिंक सुरू राहिल, तरी या कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

वरील अभ्यासक्रमांमध्ये T.Y.B.Sc. (Sem-V & VI)(Choice Based) व T.Y.B.Com. (Sem-V & VI) (Choice Based) या मधील ज्या विषयांची (Applied Componants) परीक्षा विद्यापीठाच्या वतीने संबंधित महाविद्यालयांनी घेतलेली आहे या विषयांसाठीचे पुनर्मुल्यांकनाकरिताचे अर्ज संबंधित परीक्षांचे निकाल जाहिर झाल्यापासून पुढील २० दिवसांच्या आत <u>सॉफ्ट कॉपी (सी.डी) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपुर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.</u> तसेच या दोन विषयांच्या छायांकेत प्रती महाविद्यालयाने आपल्या पातळीवर मागणीप्रमाणे पुरवाव्यात.

विद्यापीठाकडे पुनर्मुल्यांनासाठी वरील प्रमाणेअर्ज पाठविताना अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

<u>अर्ज स्वीकारण्याची वरील मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.</u>

वरील प्रमाणे विद्यापीठाच्यावतीने महाविद्यालयांनी घेतलेल्या T.Y.B.Sc. (Sem-V & VI) (Choice Based), T.Y.B.Com. (Sem-V & VI) (Choice Based) या अभ्यासक्रमाच्या Applied Componants विषयांचे पुनर्मूल्यांकन महाविद्यालय स्तरावर करून पुनर्मूल्यांकनात प्राप्त गुणांची यादी <u>सॉफ्ट कॉपी (सी.डी) व हार्ड कॉपी स्वरूपात संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यापासून ३५ दिवसांच्या आत पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.</u>

<u>वरील प्रमाणेचे अर्ज व गुणांच्या यादया नमुद केलेल्या कालावधी नंतर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही व याबाबत भविष्यात काही प्रशासकीय/तांत्रिक /न्यायालयीन बाब्री उद्‌भवल्यास यांस संबंधित महाविद्यालय जबाबदार राहिल.</u>

# University of Mumbai

या परिपत्रकात नमुद असलेल्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यतिरिक्त इतर सर्व परीक्षांसाठीचे पुर्नमूल्यांकन व छायांकित प्रतींसाठीचे अर्ज संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासुन २० दिवसाच्या आत सॉफ्ट कॉपी(सी.डी) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपुर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.

र्ज सादर करण्यासाठीच्या विशेष महत्वाच्या सुचना:-

१) पुर्नमुल्याकंनाच्या अर्जासाठी स्वतंत्र सी.डी व पत्र तसेच छायांकित प्रतीच्या अर्जांसाठी स्वतंत्र सी.डी व पत्र सादर करावीत.

२) सदर दोन्ही बाबी एकाच सी.डी. व त्यासाठी एकच पत्र असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

३) अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

४) अर्ज स्वीकारण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

उपरोक्त दोन्ही (Online / Offline) पद्धतीसाठीचा **शुल्काचा तपशील:-**

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुर्नमुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१९

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. केंद्रीय संगणक सुविधा विभागातील सर्व अधिकारी वर्ग
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्विय सहायक